राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी मंत्रालयावर आयोजित करण्यात आलेल्या महामोर्चासंदर्भात करावयाची कार्यवाही...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संघटना-१५१८/प्र.क्र.७३/१६-अ
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१८.

परिपत्रक

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात **दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८** रोजी मंत्रालय, मुंबई येथे महामोर्चा नेणार असल्याची नोटीस शासनास दिली आहे. सदर महामोर्चामध्ये राज्यातील सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ ,मधील नियम क्रमांक ६ नुसार शासकीय कर्मचा-याने कोणत्याही संप/निर्दशनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र ही संघटना शासन मान्यता प्राप्त संघटना नाही. अशा संघटनेव्दारे आयोजित महामोर्चात कार्यालयीन वेळेत सहभागी होणे ही शासकीय कर्मचा-याची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ६ चा भंग करणारी ठरेल व महामोर्चात सहभागी झालेले कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

३. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या मोर्चाचे दिवशी, शासकीय/निमशासकीय कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत:-

अ) शासकीय-निमशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत महामोर्चा मध्ये भाग घेणे गैरवर्तणूकीची बाब समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या व्यक्तीश: निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत महामोर्चामध्ये भाग न घेण्याविषयी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मोर्चा, निदर्शने, आंदोलने करण्यास प्रतिबंध राहील.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये महामोर्चा कालावधीत कार्यालयीन कामकाज व इतर सेवा सुरळीतपणे सुरु राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०२२०१२४०३३०३०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.02.20 12:44:47 +05'30'

(टि.वा.करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१६. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त.
२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३. उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२५. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२६. निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.